2023-2024

RESEARCH NEBULA
AN INDEXED, REFERRED & PEER REVIEWED JOURNAL

J-Gate INDEXED

ISSN 2277-8071

Indexed in the ICI Journals Master List

INDEX COPERNICUS INTERNATIONAL

# RESEARCH NEBULA

*An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences*

DOI PREFIX 10.22183 JOURNAL DOI 10.22183/RN IMPACT FACTOR 7.399

## TWO - DAY 47th ANNUAL CONFERENCE OF

# VIDHARBHA ARTHASHASTRA PARISHAD

3rd & 4th February, 2024

*Organized by*

# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

MIDC Road Complex, Gadchiroli-442605, MH. (India)

Guest Editor
**Dr. Shriram Kawale**
Pro Vice – Chancellor,
Gondwana University,
Gadchiroli.

Executive Editor
**Dr. Shilpa Athawale**
Coordinator, PGTD of Applied Economics,
Gondwana University,
Gadchiroli.

Special Issue Published on 3rd February, 2024
www.ycjournal.net

Scholarsteer Scholarly Information
DataCite
JIF

| | | | |
|---|---|---|---|
| 44. | विशाल मोकाशे,<br>संशोधक अर्थशास्त्र विभाग,<br>आदर्श महाविद्यालय, धामणगाव रेल्वे<br>डॉ. दीपक शृंगारे,<br>प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख<br>आदर्श महाविद्यालय, धामणगाव रेल्वे | डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या विचारातील आर्थिक धोरण | 264 |
| 45. | प्रा. डॉ. वर्षा गंगणे<br>एम. बी. पटेल कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय<br>देवारी, जि. गोंदिया | पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील योगदान | 269 |
| 46. | डॉ विष्णू एकनाथ घुमटकर<br>सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख<br>श्रीमती सु. रा मोहता महिला महाविद्यालय<br>खामगाव | डॉ. पंजाबराव देशमुख यांचे शेती व शेतकरी विषयक विचार | 273 |
| 47. | डॉ. कविता एन. मालोकार (हिरूळकर),<br>प्राध्यापक (अर्थशास्त्र विभाग प्रमुख), श्रीमती राधाबाई<br>सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगांव<br>सुर्जी, जिल्हा अमरावती, जि. अमरावती | डॉ. पंजाबराव देशमुख यांचे सामाजिक क्षेत्रातील योगदान | 277 |
| 48. | डॉ. गजानन पाटील,<br>प्राचार्य, अण्णासाहेब गुंडेवार महाविद्यालय,<br>नागपूर<br>डॉ. सारिका गजानन पाटील | डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी क्षेत्रातील योगदान | 282 |
| 49. | सागर शंकर बरशेट्टीवार,<br>आचार्य पदवी संशोधक विद्यार्थी, अमरावती विद्यापीठ<br>प्रा. डॉ. करमसिंग रा. राजपूत<br>अर्थशास्त्र विभाग प्रमुख,<br>लोकमान्य टिळक महाविद्यालय,<br>वणी जि यवतमाळ | कृषी क्रांती चे अग्रदूत : डॉ. पंजाबराव देशमूख | 288 |
| 50. | डॉ. सिद्धार्थ हरिदास मेश्राम<br>सहयोगी प्राध्यापक (अर्थशास्त्र विभाग)<br>सेठ केसरीमल पोरवाल कला आणि विज्ञान आणि<br>वाणिज्य महाविद्यालय, कामठी, जि.<br>डॉ. धीरज सुभाषराव कदम<br>सहाय्यक प्राध्यापक,पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग<br>राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर | वर्तमान कृषी अरीष्टांच्या संदर्भात डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या कृषीविषयक विचारांची प्रासंगिकता | 292 |

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

Two - Day 47th Annual Conference of Vidharbha Arthashastra Parishad
@ Gondwana University, Gadchiroli.
3rd & 4th February, 2024

डॉ. कविता एन. मालोकार (हिरूळकर), प्राध्यापक (अर्थशास्त्र विभाग प्रमुख), श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगांव सुर्जी, जिल्हा अमरावती, जि. अमरावती

# डॉ. पंजाबराव देशमुख यांचे सामाजिक क्षेत्रातील योगदान

***ABSTRACT***

डॉ. पंजाबराव देशमुख हे भारतातील एक कृतिशील व्यक्तिमत्व होय. त्यांची कर्मभूमी विदर्भ असल्यामुळे त्यांच्या कर्तृत्वाचा ठसा वैदर्भियांच्या अंत:करणावर उमटलेला आहे. आजचा विदर्भ हा डॉ. पंजाबराव देशमुखांच्या कर्तृत्वाचे फळ आहे. सामान्यांच्या जीवनाला वळण लावून त्यांची मने साकार करण्यात डॉ. पंजाबराव देशमुख यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात जे केले ते सर्व जनतेसाठी केले होते. समाजाच्या सर्व घटकांची सेवा त्यांनी केली होती. डॉ. पंजाबराव देशमुख थोर समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ, प्रभावी राजकीय नेते, सहकार प्रेमी व शेतकऱ्यांचे उद्धारकर्ते होते. अष्टपैलू नेतृत्वाच्या कुशल व्यक्तिमत्वाला जनतेने 'वैदर्भिय समाज क्रांतीचा उद्गाता' म्हणून मान्यता दिली होती.आज डॉ पंजाबराव देशमुखांच्या जीवन व कार्याची विदर्भ सोडला तर उर्वरित महाराष्ट्रात बहुतांश लोकांना हवी तेवढी माहिती नाही. डॉ. पंजाबराव देशमुखांचे सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, कृषी विषयक कार्य संपूर्ण वैदर्भिय समाजक्रांतीच्या इतिहासासाठी प्रेरणादायक ठरले आहेत. एवढेच नव्हे तर आधुनिक महाराष्ट्राच्या समाजसुधारणा चळवळीला गतीमान करण्याचे प्रभावी कार्य त्यांनी केले आहे. अशा या कृतिशील व्यक्तिमत्वाची ओळख सर्वसामान्य जनतेला होणे नितांत आवश्यक आहे. त्याकरिता डॉ. पंजाबराव देशमुखांच्या जीवन व कार्याचा समावेश मोठ्या प्रमाणात महाराष्ट्र शासनाने अभ्यासक्रमात करणे आवश्यक आहे. त्यामुळे आजच्या नव्या युवापिढीला त्यांचे विचार व कार्य ज्ञात होतील व त्यांच्यापासून या युवापिढीला सामाजिक विषयक मोठी प्रेरणा मिळेल. त्यांचे व राष्ट्राचे उज्ज्वल भविष्य घडेल अशी आशा मला वाटते.डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या कार्य कर्तृत्वाचे शिक्षण, कृषी, सामाजिक, राजकीय, साहित्यिक, सांस्कृतिक इत्यादी मानवी जीवनाशी संबंधी अनेक पैलू आहेत. या पैलूपैकी सामाजिक, शैक्षणिक राजकीय व कृषिविषयक कार्य वैदर्भिय समाजक्रांतीसाठी कारणीभूत ठरले आहेत, त्यापैकी शिक्षण व कृषी हे डॉ. पंजाबराव देशमुख यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे क्षेत्र होते. तसेच इतरही अनेक क्षेत्रात त्यांनी केलेली कामगिरी विशेष महत्त्वपूर्ण आहे. ती आपल्याला विसरता येत नाही. डॉ. पंजाबराव देशमुख यांचे सामाजिक क्षेत्रातील कार्याचा आढावा थोडक्यात घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत निबंधात केला आहे.

तात्कालीन सामाजिक व्यवस्था, अखिल भारतीय हिंदू संमेलन, श्री. श्रद्धानंद वसतीगृह, श्री अंबादेवी सत्याग्रह, सविनय कायदेभंग चळवळडॉ. पंजाबराव देशमुख पूर्व काळातील पश्चिम विदर्भातील परिस्थिती भयावह होती. या काळातील सामाजिक जीवनात एकता नव्हती. संपूर्ण समाज जातीव्यवस्थेच्या नियमांनी जखडलेला होता. अस्पृश्यता, अंधश्रद्धा, बालविवाह अशा अनेक रूढी व परंपरा प्रचलित होत्या. विदर्भातील सामाजिक जीवन कर्मठ व परंपरावादी होते. स्वतंत्र आचार किंवा विचारांना स्वातंत्र्य नव्हते. त्याचे प्रमुख कारण म्हणजे पश्चिम विदर्भात शिक्षणाचे अत्यल्प प्रमाण होते. या शिक्षणाच्या अभावामुळे पश्चिम विदर्भ किंवा वऱ्हाडात सामाजिक, आर्थिक व राजकीय विसंवाद निर्माण झाला होता. राजकीय चळवळीचे पोषण शहरी भागातच होते. परिणामी राजकारण हा वऱ्हाडातील उच्चभ्रू समाजाचा प्रतिष्ठेसाठी केलेला व्यवसाय होता.

डॉ. पंजाबराव देशमुखांचा जन्म मराठा देशमुख घराण्यात शेतकरी कुटुंबात झाला होता. पापळच्या देशमुख घराण्यांचा शेती हा पारंपरिक व्यवसाय होता, वऱ्हाडमध्ये इ.स. १८४५ व इ.स. १८९६ मध्ये भयंकर दुष्काळ पडला होता. लोकांची अन्नाविना दशा झाली होती. अमरावती येथे प्रथमच मूक मोर्चा इ.स. १८९६ मध्ये काढण्यात आला होता. या दुष्काळी वर्षातच डॉ. पंजाबराव देशमुख यांचा जन्म झाला होता. त्यामुळे त्यांचे बालपण सुखवस्तु स्थितीत झाले नव्हते, कारण पापळच्या देशमुखीत काही राम उरला नव्हता. थोडाफार दम होता तो पाटीलकीत.

इ.स. १९२६ ते इ.स. १९६५ या आपल्या एकूण ३९ वर्षाच्या काळात डॉ. पंजाबराव देशमुख यांनी सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व कृषिविषयक क्षेत्रात महत्त्वपूर्ण कामगिरी केली होती. वैदर्भिय समाज क्रांतीसाठी त्यांची कामगिरी महत्वपूर्ण ठरली आहे. डॉ. पंजाबराव देशमुख यांचे प्रत्येक क्षेत्रातील कार्य आजच्या युवा पिढीला प्रेरणादायी, मार्गदर्शक व दिशादर्शक ठरू शकते. त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व कृषी क्षेत्रातील कार्यात क्रांतीची बीजे होती. त्यामुळे त्यांचे प्रत्येक क्षेत्रातील कार्य ऐतिहासिक ठरते.

डॉ. पंजाबराव देशमुख हे एक कृतिशील व्यक्तिमत्व होते. त्यांचे विचार व आचरण समान होते. 'आधी केले मग सांगितले' या उक्तीप्रमाणे ते जीवन जगले होते. भाऊसाहेब खऱ्या अर्थाने प्रगल्भ व पुरोगामी विचारांचे होते. जातीयता त्यांना पूर्णपणे समाप्त करावयाची होती. जातिविरहित एकसंघ समाज त्यांना अभिप्रेत होता. त्यादृष्टीने त्यांनी टाकलेले सामाजिक क्षेत्रातील पहिले पाऊल म्हणजे श्री. श्रद्धानंद वसतीगृह होय. श्री. श्रद्धानंद वसतीगृह, अमरावती हे डॉ. पंजाबराव देशमुख यांनी त्यांनी स्थापन केलेली पहिली सामाजिक संस्था होती. इ.स. १९२६ मध्ये स्थापन केलेल्या श्री. श्रद्धानंद वसतीगृहात सर्व जाती व धर्माच्या आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या विद्यार्थ्यांना भोजनाची व निवासाची मोफत व्यवस्था केली होती. ही एक प्रकारे त्यावेळी सामाजिक क्रांतीच होती. समाजक्रांतीच्या बाबतींत डॉ. पंजाबराव देशमुख शब्दशूर नव्हते, तर ते क्रांतीवीर होते. भाऊसाहेब आपल्या संपूर्ण आयुष्यात क्रांतीचा शब्द कधीच बोलले नाहीत, पण त्यांनी आपल्या प्रत्येक कृतीत भारताची भावी समाजक्रांती पेरून ठेवली आहे.

२४ सप्टेंबर इ.स. १८७३ रोजी म. ज्योतिबा फुले यांनी स्थापन केलेला सत्यशोधक समाज हा सर्वसमावेशक होता. संपूर्ण महाराष्ट्राप्रमाणेच विदर्भ भूमीत म. फुले यांच्या सत्यशोधक चळवळीने चांगलेच मुळ धरले होते. म. ज्योतिबा फुले म्हणजे सामाजिक क्रांतीचे प्रेरणास्त्रोत व समतेचे प्रणेते होते. जातिव्यवस्थेवर प्रहार करणारा आधुनिक भारतातील हा पहिला बंडखोर पुरूष होय. ते डॉ. पंजाबराव देशमुखांचे दैवत होते. इ.स. १९२७ हे वर्ष डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जीवनाला वेगळे वळण देणारे ठरले होते. श्री.

श्रद्धानंद वसतीगृहांचा वाढणारा व्याप आणि विकास पाहून अनेक प्रतिगामी शक्तीनी हे अंकुरणारे रोपटे वाढू द्यायचे नाही असा जणू निश्चयच केला होता. त्यामुळे ते भाऊसाहेबांच्या प्रत्येक कार्यकृतीत अडचण आणत होते. परंतु डॉ. पंजाबराव देशमुख कधी निराश झाले नाहीत. माणसाने सदैव आशावादी असले पाहिजे असे ते म्हणत असत. त्याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे इ.स. १९२७ मधील मौशी येथील अखिल भारतीय हिंदू सम्मेलन होय. मुळात ब्राम्हणेत्तर चळवळीला व नेत्यांना शह देण्यासाठी भरविलेले हे ब्राम्हणी हिंदू संम्मेलन दोन्ही पक्षांपासून अलिप्त असणाऱ्या एक स्वतंत्र विचार करून स्वतः कृतीत आणणाऱ्या केवळ २९ वर्षाच्या डॉ. पंजाबराव देशमुख या तरूणाने गाजविले होते. त्यातून सर्वांना दिसून आली ती समाजवादी समाजरचनेची पायाभरणी व मानवतावादी विचारसरणी.

म. ज्योतिबा फुले, राजर्षी छ. शाहू महाराज, गो.ग. आगरकर यांनी महाराष्ट्रात जे समाज सुधारणेचे युग सुरू केले होते. त्या युगाची पताका समर्थपणे पेलून फडकवीत ठेवण्याचे महान कार्य डॉ. पंजाबराव देशमुखांनी केले होते. समाजक्रांती व राज्यक्रांती यापैकी राज्यक्रांती सोपी असते. याचे कारण असे की, राज्यक्रांती ही सैन्यशक्ती व कावेबाज चातुर्य या साधनाद्वारे करणे सोपे असते. त्यात परकीयांशी लढावे लागते, पण समाजक्रांतिकारकाला स्वतः स्वकीयांशीच लढावे लागते. कोणताही समाज स्थितीप्रिय असून तो बौद्धिकतेपेक्षा परंपरा जास्त जोपासत असतो. त्यांच्या रूढीप्रिय मेंदूवरील अंधःकाराचे किरण खरडून काढताना आपलेच हृदय खरडून निघत असते व रक्तबंबाळ होत असते. असे अनेक अनुभव डॉ. पंजाबराव देशमुखांच्या जीवनात आले होते.

सामाजिक क्षेत्रातील एक महत्वपूर्ण अनुभव म्हणजे त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन सुरू केलेला अमरावती येथील अंबादेवी मंदीर प्रवेश सत्यागृह होय. अमरावतीला अंबादेवीचे फार मोठे संस्थान आहे. हे अंबादेवी मंदीर अस्पृश्यांसाठी खुले नव्हते. त्यामुळे मंदीर खुले करण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख यांनी इ.स. १९२७ मध्ये अंबादेवी मंदीर प्रवेश सत्यागृहाचे नेतृत्व केले. त्यावेळी त्यांनी हिंदूची मंदीरे सर्व हिंदूना का मोकळी असू नयेत? असा प्रश्न समाजक्रांतीच्या क्षेत्रात उपस्थित केला होता. हिंदू धर्म शास्त्राच्या इतिहासात असा प्रश्न उपस्थित करणारे ते पहिले समाजक्रांतिकारक आहेत. कोणत्याही हिंदू मंदीरात अस्पृश्यांना एकदा प्रवेश मिळाला की हळूहळू हिंदू समाजमनातही अस्पृश्यांना प्रवेश व योग्य स्थान मिळेल असा व्यापक भाऊसाहेबांचा भूतदयावादी व मानवतावादी विचार होता. संपूर्ण महाराष्ट्रात अस्पृश्यासाठी मंदीर प्रवेश सत्याग्रह सुरू होण्यापूर्वी डॉ. पंजाबराव देशमुख यांनी केलेले अंबादेवी मंदीर प्रवेश सत्याग्रहाचे नेतृत्व अलौकिक ठरते.

डॉ. पंजाबराव देशमुख इंग्लंड येथून उच्च शिक्षण घेऊन परत भारतात आल्यावर विदर्भातील अनेक शहाण्णव कुळी मराठा देशमुख व पाटलांचे डोळे त्यांच्याकडे केंद्रीत झाले होते. परंतु डॉ. पंजाबराव देशमुख वेगळाच विचार करीत होते. त्याच्यापुढे जाती-पातीची बंधने नव्हती, विचारांची बंधने होती. सौदर्यापेक्षा सृजनतेकडे त्यांचा जास्त कल होता. त्यामुळे मराठा समाजाबाहेरील परंतु सुसंस्कृत व सुशिक्षित कु. विमल वैद्यचा श्री. गुलाबराव वसूनी आणलेला प्रस्ताव त्यांनी तात्काळ स्विकारला होता.

भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख यांनी आपले कर्तव्य निश्चित केले होते. सामाजिक सुधारणेचा प्रारंभ स्वत पासूनच केला पाहिले हा त्यांचा बाणा होता. जाती एकत्र आल्याशिवाय आंतरजातीय विवाह होऊ शकत नाहीत. अन आंतरजातीय विवाह झाल्याशिवाय जाती एकत्र येऊ शकत नाहीत. त्यामुळे हे जातीतील अंतर कमी करण्याचे एकमेव उपाय म्हणजे आंतरजातीय विवाह होय, या विचारांशी ते ठाम राहिले होते. त्यामुळे २६ नोव्हेंबर इ.स. १९२७ रोजी प्रार्थना समाज मंदीर गिरगाव, मुंबई येथे डॉ. पंजाबराव देशमुख व कु. विमल वैद्य यांचा आंतरजातीय विवाह संपपन्न झाला. त्या काळातील उच्च कुळातील हा पहिला आंतरजातीय

विवाह होता. डॉ. पंजाबराव देशमुख यांचे विचार काळाच्या किती पुढे होते हे दिसून येते. आंतरजातीय विवाह करून डॉ. पंजाबराव देशमुखांनी जाती-पातीची बंधने मोडून काढली होती. विदर्भच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राच्या समाजसुधारणा चळवळीच्या इतिहासातील ती एक धाडसी क्रांतिकारक घटना होती.

डॉ. पंजाबराव देशमुखांचे भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात महत्त्वपूर्ण योगदान आहे. म. गांधीच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या प्रत्येक चळवळीत भाऊसाहेब चळवळी निर्माणकर्ते व चळवळीचे संरक्षक होते. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाच्या प्रत्येक चळवळीत सहभागी असून चळवळी उभारण्याचे प्रेरणाकर्ते, निर्माणकर्ते होते.

संयुक्त महाराष्ट्र चळवळ ही या देशातील स्वातंत्र्यानंतरची सर्वात मोठी लोकशाहीवादी चळवळ होती. त्यासाठी संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना झाली होती. मुंबईसह सर्व मराठी भाषिक प्रदेशाचा संयुक्त महाराष्ट्र झाला पाहिजे ही प्रमुख मागणी होती. त्याचप्रमाणे इ.स. १९४८ ते इ.स. १९५० च्या काळात संयुक्त महाराष्ट्र की महाविदर्भ हा विदर्भात एक प्रश्न होता. मराठवाड्याचे पाच व विदर्भाचे आठ असे एकूण तेरा जिल्ह्यांचे स्वतंत्र महाविदर्भ राज्य करावे अशी ब्रिजलाल बियाणी यांची मागणी होती. त्यावेळी डॉ. पंजाबराव देशमुख यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचा पुरस्कार केला, त्याला ऐतिहासिक महत्त्व आहे. त्यांनी संयुक्त महाराष्ट्राचा पुरस्कार करण्यासाठी 'मराठी प्रदेश' नावाचे वृत्तपत्र सुरू केले होते. पुढे त्यांच्याच पुढाकाराने २८ सप्टेंबर इ.स. १९५३ च्या नागपूर करारानुसार विदर्भ महाराष्ट्रात सामील झाला होता.

महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी छ. शाहू महाराज, गो.ग. आगरकर यांनी महाराष्ट्रात जे समाजसुधारणेचे युग सुरू केले होते. त्या युगाची पताका समर्थपणे पेलून फडकवीत ठेवण्याचे महान कार्य डॉ. पंजाबराव देशमुख यांनी केले.

म. गांधीच्या नेतृत्वाखाली भारतात १२ मार्च इ.स. १९३० रोजी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू झाली. संपूर्ण भारतभर या चळवळीचा प्रसार झाला. खादीप्रचार म्हणजे स्वदेशी चळवळ होय, सविनय कायदेभंग चळवळ ही पूर्णतः अहिंसक होती. दांडी यात्रेचे किंवा मीठाच्या सत्याग्रहाचे पडसाद संपूर्ण देशाच्या कानाकोपऱ्यात उमटले. विदर्भ या चळवळीत आघाडीवर होता. १९३० च्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत डॉ. पंजाबराव देशमुख, श्री बाबराव चौवळ व श्री. दादासाहेब वाटाणे या तिघांनी मिळून खादी प्रचाराचा एक तुफानी दौर काढला होता. तीन शिलेदार' म्हणून त्यांच्या ह्या उपक्रमाचे वर्तमानपत्रांनी त्यावेळी ठळक मथळे देऊन कोतुकपूर्ण वर्णन केले होते.

इ.स. १९२९ मध्ये पंडित नेहरूच्या अध्यक्षतेखाली लाहोर येथे काँग्रेसचे अखिल भारतीय अधिवेशन भरले. या अधिवेशनात संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा प्रथमच करण्यात आली. २६ जानेवारी इ.स. १९३० हा दिवस संपूर्ण भारतात 'स्वातंत्र्य दिन' म्हणून साजरा करण्यात आला. पंडित जवाहरलाल नेहरूंनी त्यावेळी सर्व भारतीयांनी संपूर्ण स्वातंत्र्याकरिता प्रयत्न केला पाहिजे असे आवाहन केले, तेव्हा आवाहनाला अमरावती जिल्हा कौन्सिल पूर्ण पाठिंबा देत आहे असा निर्णय बहुमताने संमत केला. हा निर्णय बहुमताने घेण्याचे व स्वातंत्र्याच्या उरावाला जिल्हा कौन्सिमध्ये पाठींबा देण्याचे धाडस डॉ. पंजाबराव देशमुखांनी केले होते. त्यावेळी त्यांनी असंख्य भूमिगत स्वातंत्र्यविरांना व देशभक्तांना मदतीचा हात त्यांनी दिला होता. अशाप्रकारे डॉ. पंजाबराव देशमुख चळवळी निर्माणकर्ते व चळवळीचे संरक्षक होते.

सूत्रधार हा नेहमी पडद्याच्या मागे असतो. रंगमंचावरील कलाकारांना आपली भूमिका योग्य प्रकारे पार पाडायला लावत असतो. त्याप्रमाणे डॉ. पंजाबराव देशमुख हे भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील प्रत्येक स्वातंत्र्य चळवळीत सहभागी असून चळवळी उभारण्याचे प्रेरणाकर्ते, निर्माणकर्ते होते.

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly
Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

विदर्भात डॉ. पंजाबराव देशमुख म्हणजे वैदर्भीय जनतेचा प्राण होते. डॉ. पंजाबराव देशमुख महाराष्ट्राचे भूषण होते. त्यांना मराठी भाषा व महाराष्ट्र यांच्याबद्दल अभिमान होता. ते मूळचे महाविदर्भवादी होते. त्यांची भूमिका बॅ. रामराव देशमुख यांच्या सारखी होती. महाविदर्भाची निर्मिती ही संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या चळवळीतील एक टप्पा आहे, असे त्यांना वाटत होते. विदर्भ वेगळा झाला व मुंबईसह महाराष्ट्र वेगळा झाला तर विदर्भाचा समावेश महाराष्ट्रात केव्हाही करता येईल, पण महाविदर्भाच्या संकल्पनेचा उपयोग मराठी प्रदेशाचे तुकडे करण्यासाठी केला जाऊ लागला आहे, ही गोष्ट त्यांच्या लक्षात येताच त्यांनी महाविदर्भाची आपली भूमिका सोडली व 'संयुक्त महाराष्ट्र विदर्भासह झाला पाहिजे' या भूमिकेचा आग्रह धरला. त्यांच्या महाविदर्भाच्या भूमिकेत मराठी व महाराष्ट्राबद्दलचे प्रेम, इतिहास, परंपरा व अस्मिता यांच्याबद्दलचा आदर होता, महाविदर्भाची मागणी मराठी मुलुखाच्या एकत्रिकरणाच्या मार्गात अडसर निर्माण करणार असे दिसताच त्यांनी संयुक्त महाराष्ट्राचा पुरस्कार केला होता.

समारोप :

"वऱ्हाडातनी डॉ. पंजाबराव देशमुख जसा बुडत्याला आधार, त्यों लई गरिबाचा कनवाळू त्यो वर्हाडच्या मातीत हिरा गावला हाय, त्येची सर न्हाई यायची कुनाले." असा डॉ. पंजाबराव देशमुखांच्या कार्याचा गौरव संत गाडगे महाराजांनी केला होता.

प्रस्तुत लेखनातुन ज्ञानात व वैचारिकतेत मोठ्या प्रमाणात वाढ व्हावी. पंजाबराव देशमुख यांच्या विचारांची व कार्याची आधुनिक युवापिढी, समाजसुधारक, शिक्षण महर्षी, राजकीय नेते व शेतकऱ्यांचे कैवारी यांच्याकरिता मोठ्या प्रमाणात मार्गदर्शन करण्यासाठी उपयुक्त आहे. तसेच अभ्यासक व वाचक यांना सुध्दा मोठ्या प्रमाणात प्रेरणादायक, मार्गदर्शक व दिशादर्शक ठरेल, अशी आशा आहे.

संदर्भ :

१) सावरकर सुदाम (निमंत्रक), शेवाळकर राम व इतर (संपा.), लोकमहर्षी भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख गौरव ग्रंथ, प्रकाशक, सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती, डिसेंबर १९९९, पृ.१७.

२) सावरकर सुदाम उर्फ दामोदर तुकाराम, सुर्यकर रा.व., भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख जीवन व कार्य, प्रथम खंड, प्रकाशक, श्री. शं.रा. लोंढे, सचिव, श्री. शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती, १९६४, पृ. १२१

३) मोहिते वीर उत्तमराव, जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख, प्रकाशक, प्रा. सौ. भाग्यरेखा देशमुख, अध्यक्ष, मराठा विज्ञान मंदिर, शिवाजी नगर, अमरावती, १९८३.

४) शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख संस्थापक स्मरणिका, १९२६ ते १९९७, प्रकाशक, श्री. श्रद्धानंद सोसायटी अमरावती.

५) सत्यनारायण नीला (संपा.), लोकराज्य (मासिक), डॉ. पंजाबराव देशमुख विशेषांक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, मार्च २००१

UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

# संशोधक

• वर्ष : ९१ • डिसेंबर २०२३ • पुरवणी विशेषांक १४

G20

भारत 2023 INDIA

स्थापना : ९ जानेवारी १९२७

प्रकाशक : इतिहासाचार्य वि.का.राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे
या संस्थेचे त्रैमासिक

# ।। संशोधक ।।

## पुरवणी अंक १४ – डिसेंबर २०२३ (त्रैमासिक)

● शके १९४५ ● वर्ष : ९१ ● पुरवणीअंक : १४

**संपादक मंडळ**

● प्राचार्य डॉ.सर्जेराव भामरे ● प्राचार्य डॉ. अनिल माणिक बैसाणे
● प्रा.डॉ.मृदुला वर्मा ● प्रा.श्रीपाद नांदेडकर

**अतिथी संपादक**

● प्रा.गणेश बेले ● प्रा.डॉ.प्रमोद अलोने ● प्रा.डॉ.किशोरचंद्र रेवतकर

✲ प्रकाशक ✲

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ.वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१.
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४२२२८९४७१, ९४०४५७७०२०
ई–मेल : rajwademandaldhule1@gmail.com
rajwademandaldhule2@gmail.com

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवार सुटी)

अंक मूल्य ₹ १००/-
वार्षिक वर्गणी (फक्त अंक) रु. ५००/-; सदस्यता वर्गणी : रु. २५००/-

**विशेष सूचना** : संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्ट ने
'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळवणी** : अनिल साठये, बावधन, पुणे 21.

टीप : या नियतकालिकेतील लेखकांच्या विचाराशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

१९ Indian Economy And It's Challenging Opportunities
- Dr.Manisha Aole, Chandrapur ---------- ८१

२० Eco-critical contours in Githa Hariharan's The Thousand Faces of Night
- Dr.Manish Chakravarty, Kamptee, Dist.Nagpur ---------- ८५

२१ The Role of the Agriculture Sector in Indian Economy: Challenges & Opportunities
- Dr.Mangala Bhate, Amravati ---------- ८९

२२ Cultural Conflicts and New Challenges in Chitra Banerjee's Sister of My Heart
- Dr.Mangala Ambadkar, Mowad ---------- ९२

२३ Exploring the Nexus of Physical Education, Active Living, and Mental Wellbeing in the Neo-Liberated World: A Focus on Yoga and Daily Exercise
- Prof. Mahadevi Injaganeri, Ilkal, Karnataka ---------- ९५

२४ Challenges & Solutions in English Language Teaching: A Comprehensive Analysis
- Prof. Madhuri Sidam, Wardha ---------- १००

२५ English Language Learning In India: Problems And Solutions
- Prof. Madhura Wagh, Pune ---------- १०४

२६ Cultural Displacement in the Fictional Works of Jhumpa Lahiri
- Dr.Madhav Moharil, Nagpur ---------- १०७

२७ Diasporic Spaces and Self-Exploration: Analyzing Meena Alexander's Manhattan Music - Dr.Leena Phate, Wadi, Dist.Nagpur ---------- ११०

२८ भारतीय अर्थव्यवस्थेवर कोव्हीड-१९ चा पडलेला प्रभाव-एक अभ्यास
- डॉ.कविता मालोकार, अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती ---------- ११४

२९ पंडित जवाहरलाल नेहरूकालीन भारताचे अलिप्ततावादी परराष्ट्र धोरण
- डॉ.काशिनाथ मानमोडे, वाडी. जि.नागपूर ---------- ११८

३० 'अंतर्वंशी' उपन्यास में नारी चेतना - प्रा.कमलाकर नवघरे, हिंगणघाट, जि.वर्धा ---------- १२२

३१ कोरोना महामारी के कारण गोंदिया जिले में उपभोक्ता खरीदी व्यवहार में परिवर्तन का एक विश्लेषणात्मक अध्ययन-१)प्रा.संतोष मेश्राम, गोरेगाव, गोंदिया २)डॉ.भावेश जासानी, गोंदिया - १२५

३२ शेतकऱ्यांचे बारमाही दुःख व्यक्त करणारी कादंबरी 'बारोमास'
- डॉ.महेंद्र झलके, रोहणा, ता.आर्वी, जि.वर्धा ---------- १२९

३३ आंतरराष्ट्रीय प्रश्न व भारतीय गटनिरपेक्षता धोरणाचे विविध पैलू
- डॉ.माधुरी देवतळे. ---------- १३३

३४ पंधरावा वित्त आयोग : एक विश्लेषणात्मक अध्ययन - डॉ.महेंद्र गावंडे, कारंजा, जि.वर्धा ---------- १३७

३५ भारतातील महिलांविरुद्ध गुन्हे : एक समाजकार्यकर्त्याचे मूल्यमापन
- डॉ.मंगला कडवे, नरखेड, जि.नागपूर ---------- १४३

३६ ग्रामीण भागातील शालेय बालकांमधील बॉडी मास इंडेक्स (बि.एम.आय.) : एक मानवमितीय अभ्यास
- प्रा.मेघा रतकंठीवार, तळोधी, जि.चंदपूर. ---------- १४७

३७ डिजिटल ग्रंथालय युगातील इन्फोप्रीन्योअर : ग्रंथालय शास्त्रातील व्यावसायिक संधी
- प्रा.मोहन रतकंठीवार, तळोधी, जि.चंद्रपूर ---------- १५१

# भारतीय अर्थव्यवस्थेवर कोव्हीड-१९ चा पडलेला प्रभाव-एक अभ्यास

**डॉ. कविता एन. मालोकार (हिरूळकर)**
प्राध्यापक (अर्थशास्त्र विभाग प्रमुख)
श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
अंजनगांव सुर्जी, जिल्हा अमरावती, महाराष्ट्र, ४४४७०५

**गोषवारा :**

कोविड-१९ विषाणूचा प्रादूर्भाव भारतीय अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रांवर झालेला आहे. जसे, कृषी क्षेत्र, व्यावसायिक क्षेत्र, लघु उद्योग क्षेत्र, ग्रामीण कामगार, गुतवणूकीचे क्षेत्र, बहुराष्ट्रीय कंपन्या, क्रिडा क्षेत्र, शैक्षणिक क्षेत्र यावर झालेला असल्याचे दिसून येते. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था बंदीस्त स्वरूपाची असल्याचे जाणवते.

थोडक्यात अभ्यासाअंती वाटते की, भारतीय अर्थव्यवस्थेला या महामारीच्या संकटातून वाचविण्यासाठी सार्वजनिक ठिकाणे टाळणे, परदेश प्रवासाची माहिती आरोग्य अधिकाऱ्यांना देणे, हस्तांदोलन टाळणे, शिंकताना, खोकलताना रुमालाचा वापर करणे, व आरोग्य बाबतचे सर्व नियम काटेकोरपणे पाळणे, या सर्व गोष्टी सर्वांनी मिळून जर केल्या तर आपण या संकटातून निश्चितच बाहेर पडू असा विश्वास व्यक्त केल्यास वावगे ठरणार नाही.

कोविड-१९ चा आंतरराष्ट्रीय प्रभाव सर्व उद्योगांवर आणि त्यांच्या उत्पादनाच्या संबंधित घटकांवर पसरलेला आहे. विशेषत: आंतरकालीन संसाधन वाटपामध्ये. इंटरटेम्पोरल रिसोर्स ॲलोकेशनचा प्रभाव आकार घरगुती उपयोगिता अधिकतमीकरण यंत्रणेद्वारे निर्धारित केला जातो. जर महामारीच्या समाप्तीचा अंदाज लावला जाऊ शकतो, तर आंतरकालीन कर्ज आणि बचत सध्याच्या कालावधीची उपयुक्तता वाढवू शकते.

दीर्घकाळात, कोविड-१९ साथीच्या रोगाने भविष्यातील साथीच्या रोगांसाठी, विशेषत: माहितीची देवाणघेवाण आणि डेटा आणि समस्यांवरील संशोधनामध्ये, प्रतिवाद स्थापित करण्यात मदत केली पाहिजे. कोविड-१९ नंतरच्या काळात, औद्योगिक बदल त्यांच्या प्रगतीला गती देतील अशी अपेक्षा आहे. अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी खाजगी क्षेत्राची गतिशीलता पुनरुज्जीवित करण्यासाठी पर्याय शोधण्याची गरज आहे. या व्यतिरिक्त, उत्पादन क्षेत्रामध्ये संपर्क-मुक्त अर्थव्यवस्थेचे संक्रमण आणि डिजिटलायझेशनला गती दिली जात आहे, जेथे सतत उत्पादन आणि संरचनात्मक बदल होत आहेत असेच मत अभ्यासाअंती वापरावे वाटते. जेणेकरून विकसीत आणि साक्त भारत निर्माण होवून भविष्यात वाटचाल करेल.

**बीज शब्द :**

कोविड १९, भारतीय अर्थव्यस्था, स्थलांतरण, बेरोजगारी संकट, उपाययोजना.

भारतीय अर्थव्यवस्था आपल्या उर्जितावस्थेत असताना, तसेच सन २०१४ पासून निरंतर कमी होत चाललेला विकासदर यात ताळमेळ घालत असताना त्यात २०२० वर्षाच्या सुरवातीलाच Covid-१९ ची झळ अर्थव्यवस्थेला पोहचली असल्याचे चित्र आज आपल्यासमोर दिसते आहे. चीन या देशातून सुरु झालेला कोरोना हा संसर्गजन्य आजार संपूर्ण जगभर आणि भारत भर पसरला. या आजाराने आजवर जगभर ४१,९४,७२८ च्या वर मनुष्यबळी घेतलेले आहेत. विकसित तसेच विकसनशीलन देश याच्या प्रभावातून सुटलेले नाहीत. या कोविड-१९ चा परिणाम हा मानवाच्या अस्तित्वावर प्रश्न चिन्ह निर्माण करणारा ठरत आहे. प्रश्न निर्माण होतो आहे तो जगण्याचा आणि जिवंत राहण्यासाठीची साधने टिकविण्याचा. आजपर्यंतच्या विकासाला कोविड-१९ मुळे कीड लागत चालली आहे. केलेला विकास कसा टिकवायचा याची नव्याने उपाययोजना यातून निर्माण केल्या जाईल पण तोवर पोहचलेली झळ भरून काढणे कठीण आणि श्रमाचे काम ठरणार आहे. भारताने स्वीकारलेल्या लॉकडाऊनचा परिणाम हा पूर्ण अर्थव्यवस्थेवर पडलेला आहे. यातच जागतिक पातळीवरील अनेक संस्थांनी भारताचा विकास दरावर सुध्दा याचा परिणाम होवू शकतो असे संकेत दिले.

कोरोना विषाणूने (कोविड-१९) संपूर्ण जगाला हादरवलेले दिसून येते. अनेक आर्थिक व्यवहार ठप्प झाल्यामुळे जगातील विविध देशांच्या अर्थव्यवस्था कोलमडल्या असल्याचे निदर्शनास येते. कोरोना विषाणूचा प्रादूर्भाव होण्याअगोदर भारतीय अर्थव्यवस्था फार भक्कम स्थितीत होती असे नाही तर कोरोनामुळे उद्योगधंद्याला धोका निर्माण झाल्यानंतर देशाची अर्थव्यवस्था अधिकच कोलमडली आणि याचा परिणाम दीर्घकाळापर्यंत

ISSN No. 2394-5990

अर्थव्यवस्थेवर होईल. आर्थिक वर्षातल्या पुढील दोन-तीन महीन्यात पर्यंत अर्थव्यवस्थेची कोणतीही घडी बसण्याची चिन्ह नाहीत, मात्र टाळेबंदीच्या पहिल्या तीन आठवड्यांमध्ये देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाचे आठ ट्रिलियन डॉलर्सचे नुकसान झाल्याचा अंदाज वर्तविण्यात येत असल्याचे दिसून येते. २०२०-२१ या आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचा वेग १.९ टक्के असेल असं आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने म्हटले आहे. तोच जागतिक बँकेचा अनुमान या पेक्षाही कमी आहे. जागतिक बँकेच्या अहवालानुसार भारतीय अर्थव्यवस्था वाढीचा वेग फक्त १.५ टक्के एवढा राहील असा अनुमान दर्शविलेला आहे. आणि या कोविड-१९ च्या विषाणूमुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर कोणते परिणाम दिसून येतात याचा विचार पुढील प्रमाणे करता येईल.

२०व्या शतकाच्या सुरुवातीच्या स्पॅनिश फ्लूपासून आजच्या कोरोनाव्हायरसपर्यंत संपूर्ण इतिहासात संसर्गजन्य रोगांनी मानवजातीला धोक्यात आणले आहे. त्यांचा हानीकारक परिणाम लोकसंख्याशास्त्र आणि आरोग्य प्रणालींपुरता मर्यादित नसून अर्थव्यवस्थांच्या वाढ आणि विकासापर्यंत विस्तारित आहे. (ब्रेनर्ड आणि सिगलर, २००३, ली आणि मॅककिबिन, २००४,-ब्राऊन आणि स्मिथ, २००८).

ऑर्गनायझेशन फर इकॉनमिक को-ऑपरेशन अँड डेव्हलपमेंट च्या मते, २०२० च्या पहिल्या तिमाहीत जी-२० देशांचा विकास दर -३.४ : होता, जो १९९८ मध्ये नोंदवण्यास सुरुवात झाल्यापासूनचा सर्वात कमी आकडा आहे. २०२० च्या दुसऱ्या तिमाहीत, घसरण आणखी तीव्र झाली. -६.९: पर्यंत, २००८च्या जागतिक आर्थिक संकटादरम्यान झालेल्या - १.५ : पेक्षा आर्थिक नुकसान अधिक गंभीर असल्याचे दर्शविते. युनायटेड स्टेट्सला २०२० च्या पहिल्या तिमाहीत १.३% चा धक्का बसला, जो दुसऱ्या तिमाहीत ९.१% पर्यंत घसरला. युनायटेड किंगडममध्ये - २.२% आणि २०.४% ची घसरण झाली. आणि फ्रान्स - ५.९% आणि -१३.८% आशियामध्ये, २०२० च्या पहिल्या तिमाहीत भारताला ०.७% आणि दुसऱ्या तिमाहीत - २५.२%: धक्का बसला. कोरिया, -१.३% आणि ३.२%. जपान, ०.६% आणि - ७.९%. आणि चीन, १०.०% आणि ११.५%. महामारी आणि संबंधित निर्बंध उपायांवर आधारित, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (२०२०) ने २०२० साठी ४.४% वार्षिक जागतिक वाढीचा अंदाज वर्तवला आहे.

वर्तमान परिस्थितीमध्ये कोरोना विषाणूचा संसर्ग रोखण्यासाठी टाळेबंदीचा मार्ग शासनाने अवलंब केलेला आहे. या परिस्थितीचा भारतीय अर्थव्यवस्थेच्या विविध घटकांवर गंभीर परिणाम झालेले आहेत. जसे शेती क्षेत्र, उद्योग क्षेत्र वाहतूक क्षेत्र दळणवळण रोजगार इत्यादी घटकांवर विपरित असे परिणाम झालेले आहेत. त्यामुळे विविध आर्थिक/सामाजिक समस्या देखील निर्माण झालेल्या आहेत. एका विशिष्ट क्षेत्रावर परिणाम झाला म्हणजे अर्थव्यवस्था धोक्यात आली असे आपण म्हणू शकत नाही तर आपल्याकडे जो किराणा येतो, भाज्या, दूध, वाहतूक हे सर्व घटक अर्थव्यवस्थेत येतात. त्यामुळे कोरोनाचा एकूण अर्थव्यवस्थेवर काय परिणाम झाला हे पाहणे गरजेचे ठरते.

राष्ट्रवादीचे अध्यक्ष माननीय शरद पवार म्हणतात, ''कोरोना विषाणू हे मोठे संकट आहे. यामुळे संपूर्ण अर्थव्यवस्थेला धोका आहे. येणाऱ्या दोन ते तीन महिने आपली अर्थव्यवस्था नाजुक राहणार असल्याने आपल्याला काटकसर करणे गरजेचे आहे''.

भारताच्या समग्र अर्थव्यवस्थेवरही कोरोनाचा गंभीर परिणाम होत आहेत. भारताचा २०२० मध्ये विकास दर ५.३ टक्के राहील असे भाकीत होते. पण आज हा विकासाचा दर २.५ टक्के इतकाच आहे.

प्रणव सेन भारताचे माजी प्रमुख सांख्यिकी तज्ञ म्हणतात की, माता विकास २०२०-२१ मध्ये तीन टक्क्यांपेक्षाही कमी राहिल. या वर्षात भारताला अंदाजे पाच लाख कोटी रुपयांचा तोटा असणार आहे. टाळेबंदीचा कालावधी अधिक वाढविण्यात आला तर हे नुकसान यापेक्षा जास्त होईल असाही अंदाज त्यांनी व्यक्त केला.

लॉकडाऊन नंतर भारतातील छोटे-मोठे कारखाने बंद झालेत. दुकाने, मल, बाजारपेठा, वाहतूक व्यवस्था बंद झाली. वेगवेगळ्या खेळांच्या स्पर्धा शाळा, महाविद्यालये, सिनेमागृहे, रेल्वे, बसेस, मंदिरे अनिश्चित काळासाठी बंद करण्यात आलेत. या सर्वाचा विचार केला तर एकट्याा मुंबईचे महिन्याभराची नुकसान व सोळाहजार कोटी इतके झाले.

कोरोनाच्या या संकटामुळे मोठ्या प्रमाणात बेरोजगारी वाढली आहे. टाळेबंदीचा कालावधी वाढल्याने भारतातील सर्वात मोठे असणारे सेवा क्षेत्रातील नोकऱ्या कमी झाल्या आहेत. त्यामुळे दैनंदिन व्यवहारातील आत्मविश्वास लोकांचा कमी झालेला आहे. जोपर्यंत यावर विश्वसनीय

तोडगा निघणार नाही तोपर्यंत अर्थव्यवस्था सुस्थितीत येणार नाही.

देशात सध्या मंदीसदृश्य परिस्थिती निर्माण झालेली आहे. केवळ देशातच नव्हे तर जागतिक स्तरावर मंदीचे वातावरण आहे. अशा परिस्थितीत भारतीय अर्थव्यवस्थेला दिशा देणे आणि मंदीच्या या परिस्थितीत देशाची अर्थव्यवस्था भक्कमपणे उभी करणे पहावे तेवढे सोपे नाही. बुडीत कर्जे, उद्योगातील नकारात्मकता, वाढती बेरोजगारी, यामुळे देशाची अर्थव्यवस्था खिळखिळी झाली आहे. तिला वेग देण्याची आज गरज आहे. त्यातूनही मार्ग काढण्यासाठी सरकारने रिझर्व बँकेकडे मदतीसाठी दबाव वाढविला आहे.

शेतकरी, शेतमजूर, मच्छिमार, वनकामगार, बांधकाममजूर, घरकामगार, फेरीवाले, हातावर पोट भरणारे, आणि स्वयंरोजगारातून मंजूरी मिळणाऱ्या किमान एक कोटी पेक्षा जास्त मजूर टाळेबंदीमुळे बाधित झाले आहेत. कोरोनाविषाणूने केलेला कहर जर महिना सहा महिने असा असला तरी त्याचे दूरगामी दुष्परिणाम अर्थव्यवस्थेवर अनेक महिने आणि वर्षे पडतात असे नाकारून चालत नाही.

निसर्ग, मानव, समाज हे निरोगी राहू शकतील. यासाठी प्रत्येक व्यक्ती, कुटुंब, समाज, समूह, राज्य, राष्ट्र यांनी लाभ हानीचा विचार करून उत्पादनपद्धती आणि उपभोग पातळी ठरविली पाहिजे. काही धोरणात्मक निर्णय भारत सरकारने घेणे गरजेचे आहे. एवढेच नव्हे तर या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. देशातील बंद पडलेली उत्पादन व्यवस्था ताबडतोब सुरू करण्याचा प्रयत्न करावा, वितरण व्यवस्था कार्यक्षम करावी. जेणेकरून उत्पादन गरजू ग्राहकापर्यंत पोहोचू शकेल. गोरगरिबांच्या हातात नगदी पैसा पोहोचेल असे कार्यक्रम राबवण्याची देखील गरज आहे.

वरील प्रकारचे विश्लेषण करतांना ब्रिटिश अर्थतज्ञ लॉर्ड किन्स यांच्या विचारांचा उल्लेख करणे गरजेचे वाटते. कारण १९२९ मध्ये अमेरिकेत जेव्हा मंदी आली, आणि त्यानंतर त्यांनी जागतिक मंदीच्या स्वरूपात आपले विराट अनिष्ट रूप प्रकट केले तेव्हा किन्स यानी जागतिक पातळीवर आर्थिक विचारात क्रांती घडवून आणली इ.स. १९३६ मध्ये प्रसिद्ध झालेला ''द जनरल थेअरी एम्प्लॉयमेंट, इंटरेस्ट अँड मनी'' या ग्रंथाद्वारे त्यांनी आपले सर्व विचार जगासमोर मांडलेत. कोरोना महामारीच्या संकटात सापडलेल्या भारतासारख्या विकसनशील देशाला अशा विचारांची आज खरोखर गरज आहे.

आज देशभरात कोरोना विरोधात लढा देण्यात आला असून सहकार्याचे उत्तम उदाहरण म्हणून आज भारत देश जगासमोर आला आहे. सर्व प्रकारची वाहतूक व्यवस्था कार्यरत झाली आहे. लाखो स्थलांतरित मजूर आपापल्या गावी परतले आहेत. भारताची लोकसंख्या प्रचंड असूनही अन्य देशासाठी कोरोना महामारी जेवढी जीवघेणी ठरली. तेवढी भारतीयांसाठी ठरली नाही. कोरोना आटोक्यात आणण्यासाठी भारत सरकारने केलेले प्रयत्न कौतुकास्पद आहेत.

आत्मनिर्भर भारत योजनेचा बरासचा भाग अतिशय प्रामाणिकपणे यशस्वी झाल्याचे दिसून येते. लघुउद्योगांना करण्यात आलेल्या विशेष पतपुरवठा, शेती, फलोत्पादन, मत्स्यउद्योग आदीना केलेली आर्थिक मदत, बँकांकडून उद्योगांना दिली जाणारी कर्जे, व त्यातून उद्योगांना चालना मिळून निर्माण झालेल्या रोजगारांच्या संधी महत्त्वाच्या आहेत. छोट्या उद्योगांना पाठिंब्याची आणि मार्गदर्शनाची गरज आहे. मोठ्या उद्योगांनी एकत्रितपणे काम केले तर व्यापार आणि उद्योग या दोन्ही क्षेत्रांना बळ मिळाल्याशिवाय राहणार नाही.

**निष्कर्ष :**

आजच्या या माहामारीच्या काळात सर्वात महत्त्वाचा मुद्दा हा भूक होता. २००५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने देशात कोणताही नागरिक भुकेला राहता कामा नये असे आदेश राज्य सरकारला दिला होता. आजच्या या संकटाच्या काळात सर्व गरीबांची भूक भागविण्याचे कार्य आवश्यक होते. लॉकडाऊन टप्याने पुढे जात असताना अनेक लोकांचे वेतन, पगार थांबलेत तर काही जणांकडून त्यांचे उदर पोषणाचे साधनच काढून घेतल्या गेले. त्यामुळे अनेक मजूर आपल्या कार्यापासून बाहेर पडू लागले.

❊ आंतरराज्य स्थलांतरित मजूर कायदा १९७९ या संबंधात अनेक प्रश्नावर तोडगा देणारा होता. मजुरांना काम देणे, अतिरिक्त भत्ता देण्याचे प्रावधान या कायद्यात असूनही मालक वर्गाने याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केलेले दिसून आले.

❊ आज स्थलांतरित होऊन मजूर वर्गाला जगावे लागत आहे. त्यामुळे त्यांचा भुकेचा प्रश्न, मुलाबाळांचे शिक्षण वैद्यकीय सोयी इत्यादींचा बोजवारा उडालेला या काळात दिसून आला.

❊ आजच्या या महामारीच्या काळात फक्त मजूरच नव्हेतर पोलीस, विशेषज्ञ, डक्टर, शिक्षक, संशोधक परीचारीका, सफाई कामगार या सर्वांना त्रास सहन करावा

ISSN No. 2394-5990

लागला. आपल्या अनेक गरजा अन्न, वस्त्र, निवारा या मध्ये सात्विक अर्थव्यवस्था आणि नैतिकता यांच्या आधारावर रोजगाराची निर्मिती केली गेली पाहिजे. अन्यथा बाजार व्यवस्थेवर होणारा प्रतिकूल परिणाम सर्वसामान्य जनतेच्या स्थिर जीवनावर प्रतिकूल परिणाम झालेला दिसून आलेत.

**सूचना :**

१) सरकारने कृषी क्षेत्र, उद्योग क्षेत्र, वाहतूक, दळणवळण यातील गुंतवणूक वाढवली पाहिजे.

२) शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालाला हमी भाव दिला गेला पाहिजे.

३) आपत्ती व्यवस्थापना वरील खर्चात वाढ केली पाहिजे.

४) जनतेच्या आरोग्य सुविधांवर भर देऊन आरोग्य विभागाच्या खर्चाच्या तरतुदीत वाढ केली पाहिजे.

५) बेरोजगारीचे संकटावर मात करण्यासाठी विविध रोजगारांच्या संधी सरकारने उपलब्ध कराव्यात.

६) मजूर कामगार यांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी सुरक्षित पोहोचविण्यासाठी वाहतुकीच्या संबंधित साधनांची सोय करणे जेणेकरून त्यांची गैरसोय होणार नाही.

७) कोरोनाविषाणूचा सामना करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारच्या प्रतिनिधींचा समावेश असणारी राष्ट्रीय आपात्कालीन समितीची स्थापना करावी.

८) अनावश्यक प्रकल्पावरील खर्च सरकारने कमी करून तोच नीधी तपासणी प्रयोगशाळा व उपचार सुविधांवर खर्च करावा, खाजगी दवाखान्यांना सहकार्य देऊन त्यांना ही अनुदाने द्यावीत.

९) वृद्ध आणि लहान माणसांना जोखीम जास्त असल्याने त्यांच्यासाठी सार्वजनिक आणि खासगी दवाखान्यांमध्ये स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात यावेत.

१०) औषधे उद्योग, संरक्षक कपडे, जंतुनाशके तयार करण्यासाठी प्रोत्साहन द्यावीत. जागतिक व आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार ते फायद्याचे आहे.

११) भारतातून इतर कोरोनाग्रस्त देशात होणारी अनावश्यक प्रवास टाळावेत. कोरोनाग्रस्त देशात जाण्यासाठी विमान प्रवास टाळल्याने पर्यटन, हवाई वाहतूक कंपन्या, हटेल्स, आयातनिर्मिती उद्योगांचे नुकसान होणार नाही याष्टिकोनातून त्यांना दिलासा देण्यात यावा.

याशिवाय :

* कामाच्या ठिकाणी मजुरांना संपूर्ण संरक्षण देणे.
* अर्थव्यवस्थेला चालना देऊन नव्या रोजगारांच्या संधी निर्माण करणे.
* असल्या लोकांना टिकविणे, आणि सामाजिक सुरक्षितता देणे.

**संदर्भ :**

१. वर्तमानपत्रातील लेखांचा आधार लोकसत्ता, देशोन्नती, तरुण भारत

२. अर्थसंवाद अंक.

३. योजना मालिक विविध अंक.

४. इंटरनेटचा आधार.

५. मिन्सुक किम, अर्थास्त्र विभाग, (।इेजतंबज)

६. (ब्रेनर्ड आणि सिगलर, २००३, ली आणि मॅककिबिन, २००४,-ब्राऊन आणि स्मिथ, २००८).